वाचा : १)मा.प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग,मुंबई महाराष्ट्र राज्य यांचे पत्र,दि.२१/०३/२०२० व २७/०३/२०२०
२)मा.आयुक्त,कु.क. व संचालक,रा.आ.अ.मुंबई यांचे पत्र,दि.२३/०३/२०२०
३)मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,जालना यांचे पत्र दिनांक २७/०३/२०२०.
४)मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांच्या स्तरावरुन प्रकाशित जाहिरातीनुसार प्राप्त अर्जातुन
५)मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक रा.आ.अ.मुंबई यांचे पत्र दि.०८/०६/२०२०
६)दि.०४/०७/२०२० रोजीची पात्र व अपात्र यादी.
७)दि.०५/०७/२०२० रोजीची शैक्षणीक गुणवत्ता व शासकीय अनुभव या आधारे प्रसिध्द निवड / प्रतिक्षा यादीतुन ४९४-५०९

जा.क्र./जिरुजा/NHM/ X-Ray TECH/Covid-19/नियुक्तीआ/ /२०
कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक.
जिल्हा रुग्णालय, जालना.
दिनांक : 15/07 /२०२०.

## आदेश

वरील संदर्भीय अन्वये राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या **कोव्हिड-१९** कार्यक्रमांतर्गत कोव्हिड हॉस्पिटल, जालना येथे " X-RAY TECHNICIAN " या पदा करीता आपली नियुक्ती रुजु दिनांकापासून दिनांक ३० सप्टेंबर २०२० रोजीपर्यंत " कोव्हिड-१९ हॉस्पीटल, जिल्हा रुग्णालय, जालना येथे निव्वळ कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी-शर्तीच्या आधीन राहून नियुक्ती आदेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | आरक्षणाचा प्रवर्ग | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|
| १ | श्री. नितेश प्रेमकुमार चाटसे | अनु.जाती | रु.१७,०००/- |
| २ | श्री.विशाल अशोक मते | खुला | रु.१७,०००/- |
| ३ | श्री. पवनकुमार सतीष कचोले | अनुजमाती प्रवर्गातील उमेदवारा उपलब्ध न झाल्याने तात्पुरत्या स्वरुपात खुल्या प्रवर्गातुन नियुक्ती | रु.१७,०००/- |
| ४ | श्री.सतिष रामदास काळे | एस.ई.बी.सी | रु.१७,०००/- |

**अटी व शर्ती -**

१) आपली "(कोव्हिड-१९) X-RAY TECHNICIAN" म्हणून नियुक्ती ही **कोव्हिड-१९ हॉस्पीटल, जिल्हा रुग्णालय, जालना"** येथे **रुजु दिनांकापासून ते दिनांक ३० सप्टेंबर २०२० रोजी या** कालावधीपर्यंत राहिल. सदर कालावधी संपल्यानंतर पदाची आपली नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल, यासाठी आपणास कोणत्याही स्वरुपाची वेगळी सुचना दिली जाणार नाही.

२) नियुक्ती कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्यास आपली नियूक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियूक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.

३) नियमित स्वरुपात नियुक्ती केलेल्या जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या / राज्य सरकारच्या सेवा सुविधा आपणास अनुज्ञेय राहणार नाही.

४) आपण "(कोव्हिड-१९)X-RAY TECHNICIAN" म्हणून करार पध्दतीने केलेली सेवा वेतन निश्चिती, सेवा निवृत्ती वेतन, सेवा सलगता किंवा अन्य कोणत्याही बाबींसाठी ग्राहय धरता येणार नाही.

५) आपणास कंत्राटी पध्दतीने "(कोव्हिड-१९) X-RAY TECHNICIAN " म्हणून हमीपत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास आपणास एक महिन्या पुर्वी लेखी सूचना जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, जालना यांना देणे अथवा एक महिना मानधनाची रक्कम जमा करणे आवश्यक राहिल.

६) आपण विहित मुदतीत तशी पूर्वसुचना न दिल्यास किवा मानधनाची रक्कम जमा न केल्यास आपणास पून्हा भविष्यात "(कोव्हिड-१९) X-RAY TECHNICIAN" म्हणून नियूक्ती देण्यात येणार नाही

७) करार पध्दतीने "(कोव्हिड-१९) X-RAY TECHNICIAN" या पदांकरिता आपणास **प्रतिमाह एकत्रित रु.१७,०००/- मानधन देण्यात** येईल. त्याखेरीज इतर कोणतेही वित्तीय लाभ आपणास अनुज्ञेय राहणार नाही.

Scanned with CamScanner

८) आपली नियुक्ती ही कोव्हिड-१९ साथरोग कालावधी पुरतीच करण्यात आली आहे. साथरोग नियंत्रणात आल्यास किंवा रुग्णालयातील कोव्हिड-१९ उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणुक आपोआप संपुष्टात येईल त्यासाठी कोणतेही पुर्वसुचना किंवा एक महिना पुर्वनोटीस दिली जाणार नाही.

९) "(कोव्हिड-१९) X-RAY TECHNICIAN" या पदावर नेमणूक झालेल्या उमेदवाराने सात दिवसाच्या आत रु.१००/- च्या बॉण्ड पेपरवर विहीत नमुन्यात वरील अटी व शर्ती मान्य असल्याचे करारनामा द्यावा लागेल. त्याशिवाय मानधन अदा करण्यात येणार नाही.

१०) आपण हजर झाल्यानंतर एक महिन्याच्या आत मा.जिल्हा शल्य चिकित्सक, जालना यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

११) सदर पद हे कंत्राटी स्वरुपात असल्याने आपणास कोणत्याही प्रकारचा मा.न्यायालय/मा.उच्च न्यायालय दावा दाखल करता येणार नाही.

१२) आपणास दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी (मुख्यालयास) वास्तव्यास राहणे बंधनकारक राहिल.

१३) "(कोव्हिड-१९) X-RAY TECHNICIAN" ही नियुक्ती अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे व रा.आ.अ. प्रकल्प संपुष्टात येईपर्यंत किंवा सदर करार कालावधी संपुष्टात येईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत करण्यात येत आहे.

Raut

**अध्यक्ष**
**निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय ,जालना**

**प्रत :** माहितीस्तव सविनय सादर.

१) मा.आयुक्त (कु.क.) आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक, मुंबई.

**प्रत** योग्य त्या कार्यवाहीस्तव :-

१) अध्यक्ष, जि.ए.आ. व कु.क. सोसायटी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना.
२) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा परिषद, जालना.
३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना.
४) नोडल ऑफीसर, कोव्हिड-१९ हॉस्पीटल, सा.रु.जालना यांना देवुन सुचित करण्यात येते की, उक्त कर्मचा-यांना रुजु करुन घ्यावेत व त्याबाबतचा एकत्रित अहवाल या कार्यालयास अवगत करावेत.
५) फायनान्स कम लॉजीस्टीक कन्सटंट (FLC), जि.रु.जालना यानां देवुन सुचित करण्यात येते की, उक्त कर्मचा-यांचे रुजु अहवाल, आधार कॉपी, पॅन कॉपी व बॅक खात्याचा तपशील इत्यादी माहिती त्वरीत जमा करुन रुजु झालेल्या कर्मचा-यांची PFMS प्रणालीमध्ये माहिती अदयावत करुन या कार्यालयास विहित मुदतीत माहिती सादर करावेत.
६) संबंधितास.

स्वा -

**अध्यक्ष**
**निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय ,जालना**

Scanned with CamScanner